# हि त गु ज

## २०२३ दिवाळी विशेषांक
## मराठी असोसिएशन ऑफ मिनेसोटा





## मराठी मंडळ कमिटी
## २०२२-२०२४

**अध्यक्ष:**
अमिता पेणकर

**उपाध्यक्ष:**
विशाखा कोकाटे

**कोषाध्यक्ष:**
नैना शिरोडकर

**सांस्कृतिक सचिव:**
केतन कुलकर्णी
मिथुन जाधव
अश्विनी भोसले

**संपर्क सचिव:**
प्रविणा कुलकर्णी- पाठक
महेश चिमणपुरे

**शाळा सचिव:**
मृदुला वडके

**हितगुज संपादिका:**
अवनी सावरकर-शेंड्ये
प्रमिला जाधव

## अनुक्रमणिका


संपादकीय : अवनी सावरकर-शेंड्ये , प्रमिला जाधव

गौरी-गणपती : जयश्री मुळे

ऑनलाईन शिक्षण आणि मूल्यांची रुजवणूक : डॉ.अनिल कुलकर्णी

स्नेहबंध पहिला आंतरराष्ट्रीय मेळावा २०२३ : स्वामिनी बाबतीवाले

प्रीत : अनुपमा नेरुरकर

आभास : सुकृता पेठे

आठवणीतली दिवाळी : प्रमिला जाधव

भाजीबाजार एक निखळ आनंद! : अमोल दांडेकर

ॐ संताचे आवताण ॐ : कुंदा देशपांडे

लाइफबोट क्रमांक १३ आणि इतर गोष्टी : वासंती मुदकण्णा

संध्याकाळ : शिल्पा साठे

अप्रकाशित कविता : ऋजुता पाथरे

पाऊस : ऋचा सावरकर

आठवणीं चा पाऊस : रसिका राऊत

छोट्यांच्या दुनियेत : रिया कुलकर्णी

एक अविस्मरणीय सहल : अन्वयी & मृण्मयी वडके

मराठी शाळा : मृदुला वडके

उत्सव माझ्या दारी : कुलदीप अपराध, श्रद्धा कदम, केदार कडलासकर, केतकी कुलकर्णी, केतकी नाईक चितळे

मुखपृष्ठ गणपती चित्र : अंजली भुरे

वार्षिक अहवाल : अमिता पेणकर



# संपादकीय



**अवनी सावरकर**

**प्रमिला जाधव**

नमस्कार मंडळी Minnesotans ,

'दिवाळी सण मोठा, नाही आनंदा तोटा' या उक्तीप्रमाणे आपल्याला भरभरून आनंद देणारी दिवाळी आता जवळ येऊन ठेपली आहे. या निमित्ताने हितगुज चा दिवाळी विशेषांक आपल्यासमोर सादर करताना आम्हाला खूप आनंद होत आहे. या वेळचा विषय 'आपले सण' असा साधा सोपा असला तरीही अतिशय जिव्हाळ्याचा कारण आपण आपल्या मातृभूमी पासून खूप दूर आहोत. अशावेळी आपण थोडे हळवे नक्कीच होतो पण अमेरिकेत असलो तरी तितक्याच उत्साहाने आणि' साग्रसंगीत सण साजरे करत असतो . दिवाळीचा खमंग फराळ करत करत हितगुज हा खुमासदार लेख, कविता असलेला विशेषांक तुम्हाला नक्कीच आवडेल अशी आशा आहे.

जयश्री मुळे यांचा गौरी-गणपती ची नवलाई असलेला तसेच प्रमिला जाधव यांचा दिवाळीच्या आठवणींच्या सुंदर लेख या अंकात आहेत. सौ स्वामिनी बाबतीवाले यांचा 'स्नेहबंध' हा मिनियापोलीस येथे स्थ्ययिक असलेल्या मुलांच्या पालकांचा ग्रुप आणि त्यातील वेगवेगळ्या ऍक्टिव्हिटीज हा लेख खूपच वाचनीय आहे. श्री अनिल कुलकर्णी यांनी त्यांच्या लेखात ऑनलाईन शिक्षणाबाबत आपली परखड मते मांडली आहेत. अमोल दांडेकर यांचा मिनियापोलीस चे भाजी मार्केट, तसेच अन्वयी आणि मृण्मयी वडके यांचा कोकणातील सहलीचा लेख आणि सगळ्यात वेगळा म्हणजे वासंती मुदकण्णा यांचा बोटीवरच्या प्रवासातले अनेक किस्से असलेला असे खूप विविधांगी लेख यात आहेत. ऋचा सावरकर यांचा पाऊस आणि शिल्पा साठे यांचा संध्याकाळ या लेखातून निसर्गाचे अविष्कार वाचायला मिळतात. नुसते लेखच नाही तर अनुपमा नेरुरकर , सुकृता पेठे , कुंदा देशपांडे, रसिका राऊत , ऋजुता पाथरे यांच्या वेगवेगळ्या विषयांवरच्या कविताही वाचनीय आहेत.
तुम्हा सर्वांना दिवाळीच्या खूप खूप शुभेच्छा!! आलेली ही दिवाळी सर्वांना सुखसमाधानाची, आरोग्याची आणि भरभराटीची जावो हीच ईश्वर चरणी प्रार्थना!!
नजरचुकीने कोणाचा उल्लेख करायचा राहिला असेल तर क्षमस्व.
अंकामध्ये छापलेला मजकूर, हे साहित्यिकाचे वैयक्तिक मत असून मराठी मंडळ अथवा हितगुज संपादकांचा यात कोणताही हस्तक्षेप नाही.





# "गौरी-गणपती"



'श्री गणेशा' आगमनी
मोद जाहला मनोमनी
सगुण रूप गोजिरे
मुषक वाहन साजिरे
प्रसादा मोदक भारी
प्रसन्न मुद्रे गणेश स्वारी
तव आगमनाची आस भारी
स्वागता आमुची झाली तयारी !






'गौरी आगमन'
मोठ्ठा सण
सोनपाउली
आठवण साठवण !
आली आली गौराई आली
कोल्हापुरची 'महालक्ष्मी' आली !
गौरीच्या शुभागमनी
हळदीकुंकवाचे पाउलठसे
सदैव कृपादृष्टी सदनी वसे
फुलांची पायघडी स्वागताला
उधाण येई आनंदाला !
सोन्यारुप्याच्या पाउली
देवघर माजघर फिरुन आली
सुखसम्रुद्धी घेउन आली
शुभवदना गौराई आली
पाटावरी जरा विसावली
माहेरवाशीण पाहुणी आली !
चौरंग गालिच्यावरी
सालंकृता विराजली !
मखराची शोभा
दिव्य दिसे प्रभा
शुचितेची आभा
तेजाळला गाभा
आली आली माझी गौराई आली
सोनपावलांनी सौनाई ती आली
दे मज आशीर्वाद अंबे
ठेउनी मस्तकी हात अंबे!

असे म्हणता म्हणता मुषक वाहन बाप्पांचेआगमन ,सोनपावलांच्या गौरींचेआगमन नव्या उत्साहात जोमाने झाले आणि घराघरात चैतन्याचे स्रोत वाहू लागले आबालवृद्धांपासून सर्व तरूण मंडळी जोशपूर्णतेने कल्पकतेने बाप्पाची सजावट रोषणाई इ.साठी सरसावली. गणेश देव हा सिद्धीबुद्धीचा देव तर आहेच पण कलेचा अधिपती आहे. मग काय विचारता ? कलाकारांची कलेची हौस पूर्ण करायला गणेशोत्सवाचं छानसं व्यासपीठही मिळालं . गौरीसाठी गृहलक्ष्मींची फराळाची लगबग सुरू झाली. आमच्या घरी हा गौरीगणपतीचा सण मंगलमय आणि चैतन्यमय अशाच रितीने साजरा होतो. येणारा हा सण प्रत्येकवेळी नवीन उर्जा घेऊन येत असतो. आम्ही उभयतांनी मुलगा नितीन आणि सुनबाई स्नेहल यांच्या हाती 'गौरीगणपती' चा वसा सोपवला आणि परदेशात असून सुद्धा मुलांनी आमच्या या सणाच्या उत्साहात कुठेही कमतरता ठेवली नाही मांगल्याचा ओज प्रज्वलीत ठेवला. भाव तेथे देव असे म्हणतात. भक्तीभावाने कुठलेही कार्य केले तर ते घवघवीत होते. दिव्यत्वाच्या प्रचितीला अंतरीचा भक्तीभाव महत्वाचा असतो. म्हणुनच सातासमुद्रापार असूनही आमचा हा पारंपारीक सण वाखाणण्यासारखा होतो, आतिथींचे प्रसन्न स्वागत करता येते. त्यांची स्नेहभेट आनंद द्विगुणीत करत असते.गौरींच्या मुखावरचे तेज पाहूनच तन-मन तृप्त होउन जाते. विठोबाचे राज आम्हा नित्य दिपवाळी' या ओळीची आठवण करून देणारी दिवाळी खरेच या सणाच्या निमित्ताने साजरी होत असते. घरभर अंगणात पंचपक्वांनांचा सुवास दरवळत असतो. प्रसादाची अमृततुल्य चव तृप्तीचा ढेकर देत असते. प्रसन्नतेचे हासु गौरीगणपतीच्या चेहेऱ्यावर विलसत असते आणि समाधानाचे आमच्या मुखावर !

ही विलक्षण दिव्य अनुभूती यायला अंतःचक्षुची कवाडे उघडी ठेवावीच लागतात. प्रारंभी सुखकर्ता - दुखहर्ताया आर्ततेने केलेल्या आरती पासून जयदेवी महालक्ष्मीची वससी व्यापकरूपेतूस्थुलसुक्ष्मी ही आळवणीची आरती, त्यानंतर मी- तूपणाची बोळवण करून दत्ताला मोक्षाप्रती नेण्याची मागणी ही होते. त्यानंतर 'येई हो विठ्ठले' म्हणता म्हणता पट्टीचा सूर गगनाला भिडत जातो आरत्यांचा ऊँकारध्वनी नादब्रह्मात तल्लीन करून सोडतो. हृदयात गौरीगणपतीच्या नीजरूपाला घेउन कापुरआरतीने मंगलमय वातावरणात शब्दरूपी माला देवाच्या पायी वाहिली जाते. आर्ततेचा हा अनपुम सोहळा तो काय वर्णावा? सुवासिनींच्या हळदीकुंकवाच्या तेजाने घरदार उजळून निघते. अत्तराच्या घमघमाटाने ,फुलांच्या सुवासाने आसमंत दरवळून निघतो.ठेवणीतल्या पारंपारिक साड्यांनी नटलेल्या घरच्या गौरींच्या फुगड्या गौरीपुढे कमळाचे रिंगण घालतअसतात. पाचसहा दिवसानं तर भारावलेल्या या मंत्रमुग्ध सोहळ्याच्या सांगतेची तयारी करायला मन खट्टु होते. लहान मुलांची गणपती बाप्पाशी इतकी जवळीक झालेली असते की, त्यांची अबोध मने बाप्पाला निरोप देतांना हळवी होतात. गौरींचे विसर्जन हेही हृद्य होउन जाते. भावपूर्णतेने केलेले गौरीगणपती विसर्जन दिमाखात ,'पुढच्या वर्षी लवकर या' या गजरात होत असले तरी प्रत्यैकाची मने भरून आलेली असतात. गौरीगणपती विराजलेले आसन, विसर्जनाला सुनी सुनी मैफिल करून जाते. गणपती विसर्जनावरून घरी परततांना पावले जड होतात. चिंतामणीला आपल्या सर्व चिंता घेउन जायला सांगितल्या जातात. हेरंबा गणनायकाला भक्ताला तोषविण्यासाठी दोन्ही कर जोडून नमस्कार होतो. आमच्या चुका पाठिशी घालून मोरेश्र्वर मोरया बाप्पाला अज्ञानत्व हरोनी बुद्धीमतीची आर्जव केली जाते. आमच्या वाडवडिलांनी सांगितलेल्या काही संकेतांवरून गौरीगणपतीचा कृपाप्रसाद घरादाराला मिळालेला समजतो.सौख्य समृद्धीचे तोरण घरादारावर झुलत राहते. हे सारे अनुभव अंगावर रोमांच आणणारे असतात. गौरी ह्या रात्री घरी यऊेन कुंकु लाउन जातात हे त्यांच्या सामोरी भरून ठेवलेल्या कुंकवाच्या करंड्यात छोटी छोटी चाफेकळीची बोटे उमटलेली दिसतात तेंव्हा त्याची प्रचिती येते. याचा सातत्याने अनुभव आम्हाला आला आहे. आनंदाचे डोही आनंद तरंग !
अशा गौरीगणपतीच्या सणाची ही सांगता सुफळ संपूर्ण करून जाते. दुर्घट असुराचे निर्दालन करणाऱ्या आदिमातेला वंदन करून विघ्नहर्त्या बाप्पाला मनकामनापूर्तीची आळवणी करीत सर्वदा योग तुझा घडावा म्हणत रक्ष रक्ष परमेश्र्वर करून लोटांगण घालुया विश्र्वेदेवा सभासद इती! इति मंत्रपुष्पांजली समर्पयामी ! शुभम्भवतु!

**जयश्री मुळे**





# ऑनलाईन शिक्षण
# आणि
# मूल्यांची रुजवणूक

कुठेआहेत मूल्य?,ऑनलाइन शिक्षणामध्ये अनेक उपक्रम मुलांना दिले जातात, पण त्यातून मूल्य रुजतं का हे कोण पहाणार. मुलांना भाजी निवडतानाचा व्हिडिओ करून पाठवायचा, हे फक्त फोटो पुरतेच मर्यादित होते, मुलांनाही तेच हवं असतं, त्यांना भाजी निवडण्याचा कंटाळाच असतो, आणि आईला ही नको असतं, आपल्या मुलाला जास्त काम पडू नये, अशा प्रकारची कामं नको म्हणून त्याला तिथेच खंड पडतो.
ऑनलाईन शिक्षण हे फोटो पुरतं सीमित झालं आहे कां? मुलात कुठे मूल्य रुजतात, श्रमपरिहार भाजी निवडताना कुठे रूजतो? मेथीची भाजी कुठे ते खातात, त्यांना बर्गर, पिझ्झा यांची सवय झालेली असते, त्यामुळे पालक ,मेथी या भाज्या निवडणे हे सातत्याने जर झालं तरच पाहिजे तशी भाजी, कशी निवडावी, त्यातले श्रम मुलांना कळतील, पण कळत नाहीत हे आजच्या पिढीचं दुर्दैव आहे.
काय हरकत आहे आईने मुलांना रोज एक जुडी निवडायला सांगितली तर ती श्रमपरिहार रूजवेल व मनावर एक प्रकारचा संस्कार करेल, ते साध्य होतच नाही. ऑनलाइन शिक्षणात फक्त फोटोंचा भडिमार आहे.
योगा करायचा,आसनं करायची, त्याचे फोटो पाठवायचे, पण रोज असं किती मुलं योगा करतात, याचे सर्वेक्षण व्हायला हवं, कोणीच योगा करत नाही, पण फक्त फोटो पाठवतात असं बऱ्याच ठिकाणी आहे. काहीजण करतही असतील. तेव्हा हे जिथे होत नाही तिथे थांबायला हवं.
ऑनलाइन शिक्षणामध्ये शिक्षकांचा काहीही विद्यार्थ्यावर वचक राहत नाही. कॅमेरा ऑफ करून मुले स्वातंत्र्य घेतात.
मूल्य प्रत्यक्षात रुजवावे लागतात, त्यासाठी त्यांच्यामध्ये सातत्य हवं. एखादी गोष्ट वारंवार केल्यानेच त्याच्यात प्रावीण्यमिळतं. मूल्यांचं ही असंच आहे. एका दिवसात, वा फोटो काढून मूल्यावर प्रभुत्व मिळत नाही, मुलांमध्ये मूल्य रूजवणूक होत नाही, ती केवळ दिखाव्या पुरतीअसते व त्याची नोंद केली जाते हे थांबायला हवं. शिक्षण क्षेत्रात फार भयानक चाललेलं आहे. शाळा बंद पण शिक्षक आपल्या विद्यार्थ्यांमध्ये मूल्य रूजवण्यात कितपत यशस्वी झाले आहेत. शिक्षकांनी, पालकांनी व विद्यार्थ्यांनीही आत्मपरीक्षण करावे.
शाळेला फक्त रेकॉर्ड हवंय, असे बनावट व्हिडीओ जर रेकॉर्ड होत असतील तर मूल्यें कशी रुजणार? याचा गांभीर्याने विचार करण्याची आज गरज आहे.
नको त्या वेळेस योगासने करून घेतली जातात. थातूरमातूर कशीतरी मुले ती करतात आणि त्याचा व्हिडिओ पोस्ट केला जातो. आणि आमची मुलं योगा करतात असं अभिमानानं सांगितलं जातं, हे किती दिवस आणि कसं चालणार. मुलं रोज योगा करतात कां? आणि करत असतील तर ते मूल्य कसं रुजलं याचा विचार करायला हवा. कोणतीच मूल्य जर रूजत नसतील तर काय अर्थ आहे?. एक वेळेस फोटो नाही पाठवला तरी चालेल पण त्या मुलाला ते कौशल्य आलं पाहिजे,याचा विचार व्हायला हवा. अचानक कधी त्याला ती कृती करायला सांगितली तर त्याला यायला हवी, तर ते मूल्य त्याच्यात रूजलं असं म्हणता येईल, तेंव्हा आजच्या ऑनलाईन शिक्षणामध्ये जे काही ते दिखाऊपण चाललेलं आहे, ते थांबायला हवं.
मुलांचा संवाद आज बंद आहे. कुटुंबात आणि शाळा व समाजातही हाताची घडी तोंडावर बोट. जे पूर्वी शाळेत म्हणलं जायचं, पण आता ते घरातही आणि समाजातही म्हणलं जात असेल तर व्यक्तिमत्व घडणार कसे? ऑनलाइन शिक्षण मुलें गांभीर्याने घेत नाहीत, कधीही कॅमेरा ऑफ करून स्वतःला व्यवस्थेपासून दूर ठेवण्यात मुले तरबेज झाली आहेत.

मुलांना बिया रुजवण्यासाठी एक प्रकल्प आहे, पण तो झाला की मुलें नंतर रुजवणे किंवा वृक्षारोपण करणे याच्यात तसूभरही आवड दाखवत नाहीत. मग अर्थ काय? प्रत्येक कृतीने व्यक्तिमत्त्वात बदल घडवून आणला पाहिजे, पण थोडे मोहरीचे दाणे एखाद्या भांड्यात टाकून त्याचा व्हिडिओ करून पाठवले म्हणजे फार काही त्याने पराक्रम केला असं नाही. मुळात कसे व त्याच्या वाढीसाठी कोण कोणत्या गोष्टी आवश्यक आहेत, हवा,पाणी,सूर्यप्रकाश, प्रकाश संश्लेषण कशामुळे होते हे सगळे संबोध विद्यार्थ्यांना समजले पाहिजेत, तरच त्याला अर्थ आहे. नुसता फोटो काढून पाठवलं म्हणजे विद्यार्थी आणि शिक्षक हे दोघेही सेफ होतात. विद्यार्थ्यांच्या दृष्टीने आम्ही व्हिडिओ पाठवला आणि शिक्षकाच्या दृष्टीने आम्हाला त्याचा व्हिडिओ मिळाला, त्याच्यामुळे त्याची  कृती व त्याचा परफॉर्मन्स त्याची नोंद होते. बऱ्याच वेळेला पालकांनीच ते केलेलं असतं पण मुलांच्या नावावर तो व्हिडीओ पोस्ट होतो अशी मुले, पालकही अनेक प्रकल्पासाठी आपल्या पाल्यांना मदत करतात आणि विद्यार्थ्यांच्या नावाने पाठवतात, हे थांबायला हवं. मग मूल्यं रूजणार कशी? शिक्षणपद्धती आज टीकेची धनी झाली आहे. शिक्षण पद्धतीमध्ये निकाल लावताना, तीन वर्षाच्या सरासरीनुसार दहावीचा निकाल लावला आहे. जिथे काहीच अध्यापन झाले नव्हते, तिथेही गुणांची बरसात झालेली. ज्याच्यावर कोणाचा वचक नव्हता किंवा मुलांना नापास होण्यापासून वाचवण्याचा प्रयत्न शिक्षकांनीच केला होता. असो असं यश व या यशाची सरासरी अनेक ठिकाणी काढून, मुलांना कधी नव्हे ते चांगल्या गुणांनी उत्तीर्ण होता आलं आहे, हे यश आहे की यशााचा भ्रामक आलेख आहे.
काही मुले परीक्षा झाली नाही म्हणून रडली, कारण ती हुशार होती व अजून मूल्यमापनात वर गेली असती पण त्यांना ती संधी मिळाली नाही, त्यामुळे हे मूल्यमापन कसले व कसे याचा विचार व्हायला हवा.

नववीला अनेक शाळांमधून मुले कशी पास होतात याचं सर्वेक्षण व्हायला हवं. मुले पास केली जातात हे नववीपर्यंत होतं, आता ते दहावी पर्यंत आलं आहे. दहावीला ही कोणीही नापास नाही या अभूतपूर्व परिस्थितीमळे मूल्यांकनाचे निकष बदलावे लागले हे ठीक आहे पण ज्यांना माहीतच नव्हते की आपले हे आठवी नववीचे मूल्यांकन पुढील आयुष्याचा पाया असेल, अनेकजण गाफील राहिले त्यामुळे दहावीचा निकाल कितपत योग्य मानायचा यांचा विचार करणे आवश्यक आहे. बोर्ड शाळेवर जबाबदारी झटकून म्हणणार आम्ही शाळेकडून माहिती मागवली व शाळेने ती कितपत विश्वासहार्य माहिती पुरवली हे एक गौडबंगालच आहे.
जिथे नोंद नव्हती तिथे नोंद करण्यात आली असेल व त्याची सत्यता पडताळून पाहिली नसेल तर अनेक शाळांनी माहिती खरी दिली असेल कां? हा ही प्रश्न समोर येतो. जिथे काहीच झालं नाही तिथे शंभर टक्के कसं? याचा कोण विचार करणर. दृश्य व अदृश्य शक्तीने शिक्षणाला एवढे हतबल कधीच केले नव्हते. मूल्य विद्यार्थ्यांमध्ये रूजत नसतील तर काय अर्थ आहे. अध्यापन, मूल्यमापन योग्य रीतीने न झालेली मुले, उद्या देशाचा आधारस्तंभ ठरणार आहेत, याचा विचार व्हायला हवां.ऑनलाइन शिक्षणाने मुलांचं भावविश्व हरवलं आहे, सहवास, अनुभव, स्पर्श याला पारखी झालेली मुले फक्त मोबाईलवर, कॉम्प्युटर समोर स्वतःला व्यक्त नाही करू शकत. आता त्यांना शाळेभोवतालचं तळं अनुभवता येत नाही, मित्रांना मिठी मारता येत नाही, सहभोजन नाही, शब्दांची देवघेव नाही. तोंडाला फक्त कुलूप, अशाने व्यक्तिमत्व कसे घडणार, व्यक्तिमत्व विकासासाठी संवाद हवा जो ऑनलाइन शिक्षणामुळे व्यक्त होण्यावर मर्यादा आली आहे. ऑनलाईन शिक्षणामुळे संस्कार करणारे घटक कमी झाले आहेत, निरीक्षणाला वाव कमी झाला आहे, समाजीकरण कमी झालं आहे, शारीरिक हालचाल कमी झाली आहे, स्क्रीन टाईम वाढला आहे, हे मान्यच करावं लागेल. ज्यांच्याकडे नेट आहे तेच अभ्यासात थोडेफार सेट होत आहेत. ग्रामीण भागात सगळं अधांतरी आहे. नेट नसल्यामुळे ना ऑनलाईन ना ऑफलाईन अशा परिस्थितीत असंख्य मुले आहेत त्याचे काय करणार ? याचे नियोजनआहे कां? दूरदृष्टीचं नियोजन नसल्यामुळे आपल्याकडे यंत्रणा थिटी पडते. आपत्कालीन परिस्थितीमध्ये शाळेने काय करावे, कुटुंबाने काय करावे, समाजाने काय करावे याचे नियोजन कुठे आहे? होम स्कूलिंग वर जोर कां नाही? पालकांचं या बाबतीत प्रशिक्षण कां नाही? उद्बोधन का नाही? बहुतेक पालक आता साक्षर आहेत. १००% साक्षरता कागदोपत्री आहेच. आपली मुले आपणच घडवायची ही जबाबदारी आता पालकांनी स्वीकारायला हवी. शाळेत पार्सल पोचवलं की आपली जबाबदारी संपली असे पालकांनी आता अजिबात समजू नये. ऑनलाइन शिक्षणामध्ये पालकांना आता शिक्षक कसे आहेत हे कळत आहे, त्यांचे शिकवणे हे पालक ऐकतात, निरीक्षण करतात.

शिक्षक नेमके काय करतात कशाप्रकारे अध्यापन करतात, शाळा कशाप्रकारे मेहनत घेते याची तपासणी कोण करतो. पूर्वी शाळा तपासणी होत असे आता या सर्व बाबीकडे दुर्लक्ष होत आहे. शाळा फी आकारते त्या प्रमाणात ती विद्यार्थ्यांना, पालकांना व समाजाना जे द्यायला हवं ते देते कां? त्याचे उत्तरदायित्व कोणी घ्यायला हवं. केवळ परीक्षा घेण्याचे नियोजन असू नये तर, विद्यार्थ्यांना कोणकोणत्या संसाधनातून शिक्षण मिळेल कसें मिळेल याचे नियोजन करायला हवें. काय आणि कसें, कुठे, किती शिकवायचे याचे नियोजन करायला हवें. जिथे शाळा भरणारच नाही तिथे अभ्यासक्रम कसा पूर्ण करायचा याचे नियोजन जर करता आले तर प्रश्न उरणार नाही. काही घटक स्वयंअध्ययनाने करायचे हे ठरवून द्या काही घटक कुटुंबाने, पालकांनी होम स्कूलच्या माध्यमाने करायचे हे ठरवून द्या. काही ऑनलाईन पद्धतीने, काही विद्यार्थ्यांच्या गटाने जवळपास एकत्र येऊन चर्चा करायचे घटक ठरवून द्या. काही दूरदर्शन पाठाच्या माध्यमातून, सगळ्यांनाच उपयुक्त होतील असे घटक ठरवून द्या. तेंव्हा पाठ्यपुस्तकावरप्रश्न विचारण्याऐवजी विद्यार्थ्याने जीवन संघर्षात कोणत्या प्रसंगाला कसे उत्तर दिले हे जाणण्यासाठी प्रश्नपत्रिकेचे स्वरूप आज बदलावे लागेल हे सगळं नियोजन करावं लागेल. शाळा, पाठ्यपुस्तक याला केवळ महत्व पूर्वीप्रमाणे न देता आता मूल्य रुजवणं यावर भर द्यावा लागेल आणि शिक्षणाचे अंतिम ध्येय मूल्य रुजवणं हेच आहे. वर्क फ्रॉम फ्रॉम प्रमाणे विद्यार्थ्यांना आता लर्न फ्रॉम होम-याचा सराव करावा लागेल जे शिकायचं ते पालक, भावंड, मित्र यांच्या कडूनच शिकावं लागेल, समाजाकडून शिकावं लागेल. The destiny of nation is being developed in in the four walls of classroom हेआता शाळेत घडणार नाही. शाळेच्या बाहेरच मुले आता घडणर आहेत त्याचे नियोजन करावे लागेल. अभ्यासक्रमा ऐवजी आता जीवन क्रमाला महत्त्व येणार आहे. मुले उठल्यापासून शाळे व्यतिरिक्त काय काय करतात याच्यावरून त्यांचे व्यक्तिमत ठरणार आहे. व्यक्तिमत्व चांगले घडवायचे असेल तर केवळ अभ्यासक्रमावर अवलंबून चालणार नाही. अभ्यासक्रमाव्यतिरिक्त असे काही जीवनानुभव त्यांना द्यावे लागतील की ज्याच्या मधून ते घडतील. केवळ अभ्यासक्रमाच्या मूल्यमापनवरून विद्यार्थ्यांचे मूल्यांकन करता येणार नाही त्या दृष्टिकोनातून शिक्षणाकडे पहावे लागेल. शिक्षक चांगले चांगले उपक्रम राबवित आहेत पण त्यांच्या जोडीला पालक व समाजातील घटकांचे प्रयत्नही आवश्यक आहेत. आता मुलांचे शिक्षक, आई-वडील, मित्र, समाजातील घटक, समाज माध्यम असणार आहेत. चांगले संस्कार ही जबाबदारी पूर्वी शाळेवर असायची, शिक्षकावर असायची. आमच्या शिक्षकांमुळे आम्ही घडलो, शाळेमुळे आम्ही घडलो असे एक पिढी म्हणत असें. नावाजलेल्या शाळा होत्या, त्या नसलेल्या परिस्थितीत आमच्या विद्यार्थ्यावर आता संस्कार करायचे आहेत, ते वेगळ्या घटकांनी, त्यांनी आता संस्कार करायचे आहेत नव्या पिढीवर, त्यांना कोणी सांगणार नाही पण ते त्यांचे उत्तरदायित्व असणार आहे, तरच हा वारसा चांगल्या प्रकारे पुढेही शिक्षण क्षेत्राला वैभव प्राप्त करून देईल. न ऑनलाईन व ऑफलाईन शिक्षणाच्या समन्वयानेच सगळं सुरळीत होणार आहे.

**डॉ.अनिल कुलकर्णी**

## उत्सव माझ्या दारी



**कुलदीप अपराध**



**श्रद्धा कदम**



**केदार कडलासकर**



# स्नेहबंध पहिला आंतरराष्ट्रीय मेळावा २०२३

मुले परदेशी आपापल्या संसारात आनंदी असताना आम्हा पालकांचे इथले एकटेपण पळवून लावण्याचा हा छोटासा प्रयत्न. मिनियापोलीस येथे स्थायिक असलेल्या पुणेकर पालकांचा जमलेला स्नेहबंध हा WhatsApp ग्रुप श्री.उल्हास वैद्य आणि श्री.मिलिंद वैद्य जोडीबरोबर श्री. विश्वास भागवत यांनी मिळून सहा वर्षांपूर्वी तयार केला.
स्नेहबंधचे प्रयोजन अगदी साधे. कोणी आपल्या मुलाकडे, लेकीकडे मिनियापोलिसला जाणार असेल किंवा तिथून येणार असेल तर सोबत मिळू शकेल. काही सामानाची देवाणघेवाण होऊ शकेल. अगदीच काय तर पदार्थ देखील सहज आणि सुखरूप पोहोचू शकतील.
हा आमचा हेतू मुलांना देखील अतिशय आवडला. आपल्याच मुलांचे, नातवांचे यश, आनंद, सण एकोप्याने इथेही स्नेहबंधवर साजरे करता येऊ शकतात ही कल्पनाच किती आनंदाची आहे. तसेच आम्हा पालकांचे स्नेहमेळावे, सहली आणि त्यांचे नियोजन हे देखील किती व्यवस्थित होऊ शकते याचा वस्तुपाठच श्री.भागवत काकांनी दाखवून दिला आहे.
स्नेहबंध मधे सर्वजण अगदी कुटुंब असल्यासारखे वावरत असल्याने सभासद मंडळीचे वाढदिवस, तब्येतीची चौकशी आणि इतर गप्पा अगदी सहज होत असतात. यातच मजा म्हणजे सर्व सभासदांचे वाढदिवस, लग्नाचे वाढदिवस यांची दिनदर्शिका देखील श्री. भागवत काकांकडे अगदी तयार आहे. त्यामुळे विसर पडायचा प्रश्नच नाही. स्नेहबंध वरील गप्पांमुळे आता पुण्यात प्रत्यक्ष गाठीभेटी सुद्धा वाढल्या आहेत. या मोबाईलच्या वापराला आता आमची पिढी चांगलीच सरावली आहे बरं का आणि अमेरिकेतील आमची पुढली पिढी यावर अगदी खुश आणि अभिमानी आहे.
नातवंडांना तर आपल्या पेक्षा मोठे आजी-आजोबांचे फ्रेंड सर्कल पाहून आश्चर्य वाटते आणि आनंद पण वाटतो.
स्नेहबंध व्यतिरिक्त आमचा महिला वर्गाचा कोजागरी हा स्वतंत्र ग्रुप देखील आहे. सौ. नांदगावकर, सौ. आफळे, सौ. वैद्य आणि सौ. भागवत यांच्या पुढाकाराने कोजागिरी ची सुरुवात झाली. कोजागिरी मध्ये आपल्या बागेतील फुलांचे फोटो, पाककृती, हस्तकला, कविता अशा सारख्या गोष्टी शेअर करीत असतात.
करोना नंतर आता जून/जुलै २०२३ मध्ये आमच्या स्नेहबंध मधील बरेचसे पालक मिनियापोलिस आलो. स्नेहबंध पालक आणि मुलांचा पहिलावहिला आंतरराष्ट्रीय स्नेहमेळावा दिनांक ०८ जुलै २०२३ रोजी मिनीयापोलिस येथे साजरा करण्यात आला. मुले, नातवंडे आणि आम्ही असे सगळे यंदा एकत्र आणि प्रत्यक्ष भेटलो हा मोठा योगायोगच म्हणावा लागेल. श्री विश्वास भागवत यांची ही संकल्पना, MN पुणे स्नेहबंध, ज्युनियर या ग्रुप मधील आमच्या मुलामुलींच्या सक्रिय सहभागाने यशस्वी झाली. तसेच याचे आयोजन या ग्रुप मधील नितीन व स्नेहल मुळे, निखिल जोशी यांनी केले होते. तसेच प्रविणा पाठक, अमरजा बाबतीवाले, अवनी सावरकर, अर्पिता थत्ते, नेहा दामले आणि सहकारी यांचाही संयोजनात समावेश होता. संपूर्ण स्नेहमेळाव्याची फोटो व्यवस्था श्री नितीन मुळे यांनी उत्तमरीत्या पार पाडली.
स्नेहबंध मधील सौ ऋचा सावरकर यांच्या उर्मी या कविता संग्रहाचे प्रकाशन कवयित्री श्रीमती जयश्री मुळे यांच्या हस्ते या स्नेहमेळाव्यात करण्यात आले. तरल भावना आणि चपखल शब्द रचना यामुळे सौ ऋचा यांच्या कविता मनाचा ठाव घेतात. या कविता संग्रहाच्या प्रकाशिका त्यांची कन्या सौ अवनी अतुल शेंड्ये (सावरकर) ही आहे. या पुस्तक प्रकाशनासोबतच सर्वांच्या ओळखी, बैठे खेळ, जेवण व शेवटी फोटोसेशन असा भरगच्च कार्यक्रम होऊन मेळावा संपन्न
झाला. या स्नेहमेळाव्यात स्नेहबंध मधील अनेकांची नातवंडे, मुले-सुना, लेकी -जावई आणि आम्ही पालक उपस्थित होतो. त्यामुळे या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश सफल झाला जसे की मुलांचे आणि नातवंडांचे पण मैत्र वाढेल, संवाद वाढतील, ओळखी वाढतील, सणसमारंभाच्या निमित्ताने परस्परांकडे येणे-जाणे होईल.

मुख्य म्हणजे परदेशी देखील आपले कुटुंब असल्याची मुलांना जाणीव होईल. यातून कोणाला काही गरज पडल्यास एकमेकांना मदत नक्कीच होईल.

या यशस्वी मेळाव्यानंतर स्नेहबंधच्या सभासद मंडळींमध्ये वाढ होत आहे. आज अखेर स्नेहबंधची सभासद संख्या ७७ एवढी झालेली आहे. हरहुन्नरी पालकांच्या या स्नेहबंध मधे कोणाला सहभागी व्हायचे असेल तर सहर्ष स्वागत आहे. कृपया श्री विश्वास भागवत +91 93736 88997 यांचेशी संपर्क साधावा. हा लेख खास हितगुज साठी श्री. ऋषिकेश पांडकर यांच्या सहकार्याने लिहिलेला आहे.



**सौ. स्वामिनी बाबतीवाले**



# प्रीत

प्रीत तुझी वर्षापरी
चिंब मज भिजवून गेली
तृप्त होऊनी सरीता
सागरात सामावून गेली
स्पर्श तुझा पिसापरी
धुंद बेबंद तनु झाली
मातीच्या ओल्या गंधापरी
काया मन फुलवून गेली
स्पर्श तुझा तो भिजलेला
साथ जन्माची सांगून गेला
अर्थ माझ्या जिवनाचा
मज हळू उमजून गेला
तू दिला अद्भूत अनुभव
मन हिरवे होऊन गेले
तव प्रीतीच्या पावसात
मी पूर्ण न्हाऊन गेले.

**अनुपमा नेरुरकर**



# आभास

आकाशाचा तुकडा एकदा चुकून हाती आला
आकाशच गवसल्याचा आनंद अति झाला
क्षितिजाची किनार अगदी नजरेसमोर आली
पिंजलेल्या आभाळाची उशी करून झाली
ओंजळभर तुकड्याला त्या पुसून लख्ख केला
खाली करून आकाशाला ठेंगणेपणा दिला
आता वाटले घालावी गवसणी आकाशाला
आकारावा कर या तुकड्यातून जाणाऱ्याला
करवसुलीसाठी तिकडे जाऊन येऊ म्हटले
पण क्षितीजाच्या अंतराचे सगळे अंदाज चुकले
मग कळले आभासाला आकाश समजून बसले
आकाश म्हणून हातामध्ये आरसा धरून फसले...

**सुकृता पेठे**



# आठवणीतली दिवाळी

८०-९० च्या दशकात जन्मलेले (म्हणजे अस्मादिक ) खरंच खूप भाग्यवान म्हणावे लागतील. घरात खूप सारी माणसे जसे आजी-आजोबा , काका-काकू , मावशी ,आत्या या सर्वांचा सहवास आपल्याला मिळाला . आपले सण संस्कृती परंपरा हे खूप जवळून अनुभवता आलं. नवीन आणि जुन्याची उत्कृष्ठ सांगड म्हणजे ८०-९० च्या दशकातली आपली पिढी.
आपले सण हा विषय मिळाला आणि मन आपसूकच भूतकाळात गेलं आणि थेट दिवाळसणात जाऊन पोचलं.
सातासमुद्रापार असलो तरीही आपण आपले सण जमेल तसे छान साजरे करतो, मुलांनाही त्याचं महत्व सांगतो जेणेकरून आपली संस्कृती आणि वारसा पुढच्या पिढीपर्यंत पोहोचवता येईल. पण आपल्या लहानपणी या सणांची वेगळीच मजा असे. 'दिवाळी सण मोठा नाही आनंदा तोटा' हे अगदीच खरं.
नोव्हेंबर महिन्यातले थंडीचे दिवस, शाळेच्या सहामाही परीक्षा संपून दिवाळीच्या सुट्ट्या लागलेल्या असायच्या. आई आणि आजीची लगबग सुरु असायची.दिवाळीच्या सामानाची यादी करण्यापासून सुरुवात होत असे. डाळ, तांदूळ, रवा, मैदा, तुप, तेल, सुकामेवा तसेच उटणे सुगंधी तेल आणि सगळ्यात महत्वाचा म्हणजे सुगंधी साबण !! एकदा का वाणसामान घरी आलं की आईची पुढची कामे सुरु होत असत. डाळ तांदुळ निवडणे, स्वच्छ धुवून वाळत घालणे, करंजी साठी खोबरं किसून ठेवणे अशी एक ना अनेक शंभर कामे असत. दुसरीकडे बाबांची आकाशकंदील लावायची तयारी सुरु असे.
एकच आकाशकंदील साधारण २-३ वर्षे वापरायचो आम्ही, बहुदा सगळेच. फटाके कोणते आणायचे यावर चर्चा आणि वादविवाद सुद्धा असत. त्याआधी कपड्यांची खरेदी झालेली असायची. तेंव्हा आतासारखी दर महिन्याला कपडे घेण्याची पद्धत आणि ऐपत दोन्ही नसायची. त्यामुळे दिवाळीतल्या नवीन कपड्यांचं फार अप्रूप असायचं.

लहान मुलांची किल्ला करायची तयारी असे. त्यासाठी माती, विटा, गोणपाटाचा कपडा अशा वस्तु जमवणे. माळ्यावर जपून ठेवलेले मावळे आणि शिवाजी महाराज तसेच सिंह ,वाघ हत्ती असे प्राणी मग खाली काढले जायचे . एखाद्या मोठया दादा ला हाताशी धरून मुले किल्ला बनवत असत. त्यात छोटीशी विहीर आणि मोहोरी चे दाणे टाकून उगवलेले हिरवेगार शेत सुद्धा असायचे !! एकदा का सिंहासनावर शिवाजी महाराज विराजमान झाले कि मग किल्ला खूप सुंदर दिसत असे.
आई आधी गोड पदार्थांपासून सुरुवात करायची ते म्हणजे लाडू . त्यानंतर खमंग चकली, शेव चिवडा, करंजी, शंकरपाळ्या आणि शेवटी अनारसे असा सगळा घाट असायचा. सगळे मिळून फराळ बनवण्यात खूप मजा यायची.
त्यानंतर रांगोळी ची तयारी .आम्हा मैत्रिणींमध्ये अगदी चढाओढ असायची कि कोणाची रांगोळी सगळ्यात छान दिसते. पहाटे उठून आधी आम्ही बहिणी रांगोळी काढायचो आणि मग आई उटणे लावून छान अंघोळ घालायची . फराळ करून आणि नवीन कपडे घालून कधी एकदा फटाके फोडायला जाऊ असं व्हायचं.
वसुबारस ते भाऊबीज असे चार पाच दिवस हा आनंदोत्सव चालायचा. अजूनही दिवाळी म्हटली की मन आपसूकच बालपणात जातं. देश बदलला , संस्कृती हि थोडीफार बदलली पण या दिवाळीच्या आठवणी कायम मनात कोरलेल्या राहतील ...





**प्रमिला जाधव**



# भाजीबाजार एक निखळ आनंद! (मिनियापुलीसचे, कॉटन मार्केट!)



काल बाबांसाठी खूप आनंदाचा दिवस होता. कारण त्यांना मिळाला होता त्यांच्या सगळ्यात जिव्हाळ्याचा ‘भाजी बाजार’ अगदी कॉटन मार्केटच! आम्हाला या भाजी बाजाराचा म्हणजे मिनियापोलीस फार्मर मार्केट चा शोध गेल्या वर्षीच लागला होता पण मुहूर्त लागला नव्हता.
काल आसावरीचा गाण्याचा क्लास झाला आणि गाडी भाजी बाजाराकडे घेतली. वाटेत जुन्या मिनियापोलीस मधील काही दगडी तर काही सॅण्ड स्टोनची देखणी चर्च पाहत हळू हळू गाडी भाजी बाजारात पोहोचली. जवळ पोहोचल्यावर लगेच बाबा म्हणाले की अरे हे तर आपले कॉटन मार्केट आहे! आम्ही नागपूरकर त्यामुळे नागपूरच्या रेल्वे स्टेशन समोर जो भाजी बाजार आहे त्याला कॉटन मार्केट म्हणतात. परदेशात कुणी खूप जुना मित्र भेटावा असं त्यांना झालं. गाडी पद्धतशीर तळावर लावली, खूप गर्दी होती, तरीही नशिबानं माझ्यासाठीच ते पार्किंग राखून ठेवलं होतं.
उतरलो, विस्फारलेल्या नजरेनी आज अमेरिकेतील एक वेगळेच चित्र मीही पाहत होतो. माझ्या या १० वर्षाच्या अनियमित वास्तव्यात ही अमेरिका माझ्यासाठी पण अनोखी होती. एकापाठोपाठ एक अशी ४ मोठी शेड्स. भाजी बाजार असला तरी तिथे कुठेही सडकी भाजी, घाण, कचरा, उघडं मास, भटके कुत्रे किंवा गायी नव्हत्या हे पहिलेच सांगून ठेवतो.
शेडमध्ये जायला व्यवस्थित पायऱ्या आणि व्हील चेअर ऍक्सेस. प्रत्येक स्टॉल वर मालकाचं नाव स्वच्छ अक्षरांत लिहिलेलं. टेबलवर भाजी छान सजवलेली, छोट्या छोट्या परड्यांमध्ये लाल चुटूक टोमॅटो (भेंद्र-हे विदर्भातील टोमॅटोचं नाव) उठून दिसत होती. हिरव्या शेंगा आकर्षक होत्या, काकड्यांच्या २-४ व्हरायटी मागल्या रांगेत शान्त बसल्या होत्या. बाजूच्या फुलवाल्याकडल्या लिली ने आकर्षित केलं मग त्याच्याकडच्या इतर मनमोहक रंगीबेरंगी फुलांनी तिथंच घुटमळलो, झरबेरा, गुलाब, कोंबड्याचे लाल हिरवे तुरे. करड्या रंगाची आणि सोनेरी कडा आणि तितकेच नाजूक स्टिग्मा आणि कोवळे पराग असणारी ती लिली हॉलिवूड ची तारकांचा जणू ! त्यानंतर एक फळवाला मोठाली टरबूज, लाल लाल स्ट्रॉबेरी, सफरचंद, द्राक्ष नीट रचून ठेवलेली. (या गर्दीत पेरू आठवला, पण तो इकडला नाही ना, तरीही आठवला, पपई ही आमची, ती ही नव्हती).
माझा मोह आवरेना मग मी बायकोला म्हंटल की तुम्ही विकत घ्यायचं काम करा मी माझं काम डोळ्यांन करतो. तसही मी शेतकऱ्याचा नुसताच नातू आहे त्या शेतीतलं मला काही कळत नाही ना भाजीतलं, मला आपलं मोठी कोबी फक्त घेता येते. भाजी घ्यायला जातो तेव्हा बायको बजावून ठेवते कोबी आणू नको, इथे माझ्या अर्ध्या उत्साहाचं खच्चीकरण होतं असो. मग माउली म्हणाली बाळा मलाही त्या भाजी घेण्यात काही स्वारस्य नाही त्यापेक्षा मी पण येते तुझ्याबरोबर . परफेक्शनिस्ट बाबा आणि त्यांची शिस्तप्रिय सून यांनी भाजी खरेदी केली आणि त्यां दोघांच्या शिकस्तीत न बसणारे आम्ही दोघे अघळ-पघळ माता-पुत्र निघालो फेरफटका मारायला. विंडो शॉपिंगचा कोण आनंद असतो तो या शॉपिंग करणाऱ्याला नाही कळायचा, आनंद तोच पण खिश्यात अजिबात हात घालावा लागत नाही. शहर कसं पाहावं, आनंद कसा घ्यावा हे पुंलनी रुजवलं, तर अनिल अवचटांनी 'पुण्याची अपूर्वाई' तुन त्यावर इमला रचला, असो!
मग दुसऱ्या शेड मध्ये शिरलो. कुठं लठ्ठ अमेरिकन काकू, तर कुठे काळा चष्मा लावलेल्या गोड अमेरिकन आज्जी. या आज्जीकडे पाहून मला काही कॉटन मार्केट मधल्या आज्या पेक्षा बुढ्या, बाढया आठवल्या. माझ्या बाबांची एक ठरलेली म्हातारी होती जिच्याकडून ते काही ठराविक भाज्या घ्यायचे, मग कधी-कधी ते दोन पावलं पुढं गेले की ती मागून बोलवायची "ए बाबू हे घेजो", कारण या आधी किंमत पटली नाही म्हणून निगोसिकेशन्स फेल झालेली असत! पण ही एक न पुसली जाणारी आठवण असते आणि ती मना च्या डोळ्यांनी टिपलेली असते.
कुणाकडे मध (local honey which is good for fighting pollen allergies), इकडला रान मेवा पेक्षा सुका मेवा तर कुठे हर्बलचा स्टॉल. कुठे लाल गाजर, कुठे ताजं फरस बी, तो कही शलजम (बिट), भरताची मस्त वांगी, पांढरा थोरला मुळा. मला काहीच खरेदी करायचं नव्हतं त्यामुळे एखाद ठिकाणी घोटाळलो असेल तर असेल. असेच दोन शेड बघितले.

शेडला लागून भाजी विक्रेत्याची गाडी त्याला पार्क करता यावी म्हणून प्रत्येकी दोन तळ राखून ठेवलेले, गाड्या शिस्तीत लावलेल्या. गडबड नाही उगाच कोणाची भांडण नाही, सगळा व्यवहार सौजन्यान मग पलीकडे तंबूतला बाजार होता कपडे, T शर्ट, गॉगल. एका ठिकाणी थबकलो चक्क कोंबड्याचा मोठा पुतळा, पांढऱ्या रंगाचा, लाल तुरा असणारा डौलदार कोंबडा, मग कोंबडोबांचा एक फोटो काढायचा मोह आवरला नाही.
कोंबड्याला पाहून मला पुलं, वसंतराव देशपांडे आणि गदिमा यांचं "माझ्या कोंबडयाची शान" हे गीत आठवलं.
माणूस म्हंटला की त्याला खायला लागतं मग कुठं पॉप कॉर्न, कॉटन कँडी, एका ठिकाणी तर अक्षरश: वडा तळल्याचा मला दिसला पण चिकन बॉल वैगेरे असावा. मग उजवीकडे 'फ्लॉवर मार्केट' अशी एक पाटी लागली होती त्यात शिरलो, इथं इंदोर आठवलं ! सूर्य फुलांइतका मोठा झर्व्हेरा, नाना विविध पुष्प गुच्छ इ. इ. त्याच्या त्या थंड केलेल्या एका गारातून आम्ही दोघे मुशाफिरी करून आलो. बाहेर आल्यावर गार्डन आर्ट आणि एका कृत्रिम ओढया वजा हिरवाईकडे ओढल्या गेलो. थोडं आत गेल्यावर टाकाऊ वस्तूंपासून रंगीबेरंगी बगळा, डायनासॉर, बकऱ्या, कासव, मासे, कोंबडे, कुत्रे इ. बनवले होते. एका लोखंडी बेंचवर थोडे शान्त बसलो ही अजब खेळणी बघितली आणि मनातल्या मनात म्हंटल "अरे सब्जी मंडी में ऐसा भी होता हैं!". ही पण एक कला टाकाऊ धातू किंवा ऑटोमोबाइलच्या टाकाऊ सुट्या भागापासून बनवलेल्या या वस्तू. पण अमेरीकेतील अंगण यान आणि असल्या अनेक वस्तुंनी सजलेली आहे. इतक्यात बाबा, बायको आणि मुलगी आले, मग मुलीबरोबर पुन्हा एक चक्कर मारली, आसावरीला म्हंटल काय कोंबडी, बकरी आणि मासा येतं आहे का काही ध्यानात?
मग गदिमांची एक नुकतीच वाचलेली भन्नाट कविता तिच्या ध्यानात आली ....

कोंबडीला आला टेलिफोन
कोंबडीला आला टेलिफोन
तिनं विचारलं, ‘‘बोलतंय कोण?’’
बोलत होता रावस मासा
तो म्हणाला, ‘‘सावध असा.
शेजारीच आहे मेजवानी
हिंडू बिंडू नकाच कोणी.’’
कोंबडीनं फोन ठेवून दिला.
तिचा जीव घाबरून गेला......

मग सगळेच परतीला लागलो, इतक्यात बाबाना एका स्टॉलने आकर्षित केले हापण एक कलावंत, याच्या स्टॉलवर तुटके खराब झालेले, काही वाकलेले चमचे, काटे चमचे यापासून त्यानं काही शो पीस बनवले होते. बाबांना या कलाकाराचं खूप अप्रूप वाटलं, मग त्यांनी त्याला विचारलं की मी तुझं एक छाया चित्र घेऊ का? (आता अमेरिकेत Photograph म्हंटल तर पटकन कळत नाही तेच Picture म्हंटल तर पटकन कळत, हे अमेरिकन इंग्लिश!) त्याला जस picture म्हंटल तसा त्यानं लगेच होकार भरला. तोही खुश आणि बाबा ही.
पण बाबाना कोण आनंद झाला, त्या क्षणी मला आणखीन अश्या बाजार वेड्या दोन व्यक्तींचं स्मरण झाल्यावाचून राहील नाही ते म्हणजे माझा काका आणि दुसरे म्हणजे वैद्य काका. हे ते नागपूरकर आणि कॉटन मार्केट प्रेमी मंडळी आहेत की ज्यांनी त्यांच्या आयुष्यात भाजी आणि फळ खरेदी केली असेल तर ती फक्त कॉटन मार्केट मधून.
निघताना आता असं ठरलं आहे की भाजी इथुनच! मग बाबांनी कॉटन मार्केटच्या काही आठवणी सांगितल्या, हायवे वरून येताना शहर बघत बघत आतल्या सुंदर आणि निसर्गाच्या जवळ असलेल्या रस्त्यानं आलो. हा छोटासा बाजारहाट इतका आनंददायी असू शकतो? जस Beauty lies in eyes of beholder तसच शेवट आनंद मानण्यात असतो नाही का?

**अमोल दांडेकर**



आपण जेव्हा देवस्थानांचे दर्शनाला जातो तेव्हा तिथला महाप्रसाद भक्तीभावाने घेतो कारण त्यांतून भगवंताची शुभस्पंदने आपल्या अवघ्या देहमनाला अलौकीक तृप्ती देत असतात.तो खरोखरीच कृपाप्रसाद असतो.

जेव्हा एखाद्या शुभसमयी आपल्याला संताचे घरी भोजनाचे “आवतण- आमंत्रण” आले तर काय नवल घडेल ? ते नुसते भोजन नव्हे तर आमूलाग्र बदल घडवणारी शिकवणच असते..

काय नवल घडते ? .... आजच्या कवितेत समजेलच

# ॐ संताचे आवताण ॐ

आले आवताण संताचे घरी
भोजनाचा लाभ,संधी मिळे न्यारी ।
सजलेधजले डोई ओढला पदर
पटपटा चाले, वाट होती जरा दूर ।
स्वागता उभे संत, हातपाय प्रक्षालती
“अहंकार” धूळ सये, हळूहळू धूती ॥१॥



सारवल्या भुईवर”भक्तीचे ताट”
“दयाक्षमाशांती” वरण लिंबूभात ।
“वैराग्याची”दशमी,”प्रेमाचा” सुधारस
भरविती स्वंये घांस तोही सावकाश ।
लागे ठसका “ संयम” जल देती
वात्सल्यभाव नेत्री,हवेनको पुसती ॥२॥



॥ अक्कलकोटनिवासी श्रीस्वामी समर्थ ॥

अघटीत मग घडे संताचिया घरी
“अवगुण” दागिने माझे गेले की हो चोरी ।
फेडली “मायावस्त्रे “ , फाटली “मन” चोळी
लज्जित खाली मान तरीही ना उघडी ।
संत कनवाळू “आत्मज्ञाना” पांघरती

“नामे“ भरून ओटी,” मोक्ष” तांबूल दे हाती ।

धन्य झाले सेविता, संताघरचे भोजन
लाभो साऱ्या जीवा “ संताचे आवताण “

कुंदा देशपांडे



# लाइफबोट क्रमांक १३ आणि इतर गोष्टी

समुद्रपर्यटनाबद्दल माझ्या काही खास कल्पना होत्या. म्हणजे काय की एकदा जहाजावर चढलं की जगाशी सगळा संबंध तोडून टाकायचा आणि सिंदबादसारखा जलप्रवास करतकरत अद्भुतरम्य गोष्टींचा अनुभव घ्यायचा. म्हणून वाय-फायचं कनेक्शन नं घेता आम्ही आमचा जलप्रवास व्हॅन्कूव्हरहुन सुरु केला. पण नशीब बघा कसं की व्हॅन्कूव्हर जरी कॅनडात असलं तरी प्रवासातलं प्रत्येक बंदर अमेरिकेत असल्यामुळे जहाजाने बंदरात नांगर टाकताच फोन आपोआप आसमंतात पसरलेल्या एटीनटीच्या जाळ्याला बिलगायचा आणि मग जगात काय चालले आहे हे पाहण्याचा मोह आम्ही बाजूला सारू शकायचो नाही.
आमच्या जहाजाचं नाव व्होलंडाम होतं. जहाजाची कंपनी हॉलंडमधील होती म्हणून असेल काहीतरी हॉलंडमधलं नाव असा विचार करत आम्ही आमच्या खोलीत  गेलो आणि लगेच शाळेत होते तशी लाउडस्पीकरवर घोषणा झाली की सगळ्यात आधी सर्व प्रवास्यांनी आपापल्या नियुक्त केलेल्या लाइफबोटची ओळख करून घ्यावी. आरक्षित लाइफबोटी? आम्हाला लाईफबोट ५ नियुक्त केली होती. म्हणजे जहाज बुडते आहे आणि आम्ही म्हणजे माझा नवरा अँड्रू आणि मी पाच नंबरची बोट शोधत एसटी स्टॅण्डवर बस शोधत पळतात तसे इकडून तिकडे पळत आहोत असे दृश्य माझ्या डोळ्यापुढे आले. पाच नंबरच्या मजल्यावर जहाजाच्या कडेला दहा-बारा लाइफबोटी टांगलेल्या होत्या.

आमची बोट पाहून मी आमच्या खोलीत गेले आणि अँड्रू जहाजावर भटकायला गेला. पाचच मिनिटात जहाजाच्या ऍपवर मला अँड्रूकडून एक संदेश आला - "कम, लेट अस किस अंडर आवर लाइफबोट"! हे काय भलतंच! प्रियकरानं ताऱ्यांखाली किस करावं असं म्हटलं तर एक वेळ आपण समजू शकतो पण लाइफबोटीखाली? मी हसतहसत कपाटांमधे कपडे लावू लागले.
आमच्या खोलीला नियुक्त केलेला योगा नावाच्या कर्मचाऱ्यानं आपली ओळख करून दिली. साहजिकच अँड्रूनं पण आमची ओळख करून दिली पण त्याला वासंती हे नाव जमणार नाही म्हणून माझी ओळख 'टी' अशी करून दिली. पण गंमत म्हणजे योगा आम्ही दिसलो की "हॅल्लो, अँड्रू अँड टेया, डू यू नीड एनिथिंग?" असं आपल्या गडगडाटी आवाजात विचारायचा. 'टी'चं त्यानं 'टेया' करून टाकलं होतं! दिवसातून दहादा भेटला तरी हेच संभाषण! नंतरनंतर मी तो दूरवर कॉरिडोरमधे दिसला की मी पटकन यू-टर्न करायची!
 खाण्यापिण्याची सोय जवळजवळ चोवीस तास होती. मुख्य आचाऱ्याचे नाव सुब्रमण्यम होते. तरीच पहिल्याच दिवशी मला दही-भात, दाल-तडका, आणि पापड असे जेवण मिळाले! रोज काहीनाकाही भारतीय पदार्थ असायचे. पण माझा उत्साह लगेचच मावळला कारण प्रत्येक पदार्थ नावापुरता भारतीय होता, पण त्यात ना जिभेला झोम्बणारी मिरची होती ना हिंगेची फोडणी. जाडजूड 'रोटी'ला पाटक्स अचार फासताफासता 'दाल-तडक्यातला तडक्याला तडीपार का केले', 'विंडलू हा गोव्यातला पदार्थ अमेरिकेतल्या उपहारगृहात का मिळत नाही', आणि 'पाठकांनी इंग्लंडमधे लोणच्याचा व्यवसाय सुरु केला आणि त्या बरोबर आपले नावही 'पाटक' करून घोर पातक केले' असे विचार माझ्या मनात आले. पूर्वीच्या स्वयंपाक नं येणाऱ्या भारतीय स्त्रियांच्या नवऱ्यांप्रमाणे मी लोणचं तोंडी लावायला घेण्याऐवजी भाजी म्हणून घेऊ लागले.
जहाजात अर्थातच सजावट केलेली होती. ठिकठिकाणी पुतळे आणि चित्रे लावलेली होती. एक अगदीच फालतू चित्रकृती पाहून अँड्रू उद्गारला 'व्होलन डॅम'. तेव्हापासून जर एखादी मस्त शिवी हासडावीशी वाटली तर आम्ही 'व्होलन डॅम' म्हणू लागलो.

पहिल्याच संध्याकाळी आमचे जहाज बर्राई इनलेटमधे बराच वेळ थांबले. का ह्याचा उलगडा दुसऱ्या दिवशी लाउडस्पीकरवर झाला. एक वृद्ध बाई आजारी पडली आणि तिला एका छोट्या बोटीतून परत न्यावे लागले. मी कॅफेमधून खाली येत होते तेव्हा मला एक बाई आणि तिचा एक आठ-नऊ वर्षांचा मुलगा जिन्यातून वर जाताना भेटले.

मुलगा बहुतेक पोहून आला होता कारण त्याच्या कमरेभोवती टॉवेल होता. आई त्याला पटकन आपल्या खोलीत घेऊन जायचा प्रयत्न करत होती पण तो जिन्यात थांबून थांबून तिला सांगत होता, “मॉम, काल ती म्हातारी बाई होती ना, जिला छोट्या बोटीतून दवाखान्यात न्यायला लागलं, तिच्या लाइफबोटचा नंबर १३ होता!” आई म्हणाली, “मग?” मुलगा म्हणाला, “मी असं म्हणत नाहीये की त्यामुळेच ती आजारी पडली, पण कुणालाही असंच वाटेल ना?” आई हसत म्हणाली, “हो रे बाबा!” मी पण हसले आणि पाश्चात्य लोकांचं आणि १३ ह्या आकड्याचं एवढं वाकडं का ह्याचा विचार करू लागले. अमेरिकेतल्या बऱ्याच हॉटेलांत तेराव्या मजल्याला चौदा हा आकडा दिलेला असतो.

हे समुद्रपर्यटन अलास्काच्या ‘इन्साईड पॅसेज’चे होते. व्हॅन्कूव्हरच्या आसपास भूवैज्ञानिक प्रक्रियेने अनेक छोटीमोठी बेटं तयार झाली आहेत. इथेच माझ्या भाचीनं म्हणजे उमानं पंधरा वर्षांची असताना इतर सात मुलींबरोबर सी-कायाकिंग केलं होतं! पाच दिवस ह्या मुली समुद्रावर चक्क राहात होत्या! रात्री झोपायला बेटं होतीच ढिगानं! समुद्राच्या तांडवापासून ही जागा सुरक्षित आहे. त्यामुळे जहाज सरळ जात होते आणि समुद्राचा कुणाला त्रास झाला नाही. एका रात्री जेवण झाल्यावर अँड्रूनं फार पूर्वी पुण्यात आमच्या घराचा काढलेला आणि टोपाझ ही एआय ॲप वापरून सुधारणा केलेला विडिओ दाखवून मला आश्चर्यचकित केलं. मन एकदम आई, बाबा, बहीण, आमचं घर आणि दारी असलेली फळांची झाडं ह्या आठवणीत बराच वेळ गुंतून राहिलं.
सकाळी आम्ही जूनोत नांगर टाकणार होतो. हळूहळू समुद्रावर आणि जमिनीवर पसरलेलं धुकं विरत होतं. चहाचा कप देत अँड्रूनं ‘दमभर जो इधर मुह फेरे’ हे गाणं लावलं. कुई बेटाचं पूर्वदिशेचं टोक धुक्यातून दिसू लागलं. मी हसत अँड्रूला म्हणाले, “ह्या दृश्याच्या पार्श्वभूमीवर स्टीव्ह मिलरचं ‘वाइल्ड माउंटन हनी’ हे गाणं ऐकणं जास्त उचित ठरेल”. त्या दिवशी आम्ही ट्रेसी ॲन फिओर्ड आणि हिमनदी पाहायला जाणार होतो आमच्या कॅटामरॅन प्रकारच्या बोटीत काही दोष निर्माण झाला म्हणून आम्ही जाऊ शकलो नाही.

दहा वाजता जूनोत पोचलो. मेंडेनहॉल हिमनदी पाहायला बसने गेलो. बसचालिकाच जूनोची माहिती देत होती. माहिती ऐकताऐकता माझे कान एकदम टरकले. ती म्हणत होती, “जूनोत दागिन्यांची खूप दुकानं आहेत. गंमत म्हणजे ही दुकानं क्रूझ कंपन्यांची आहेत. आणि दुसरी गोष्ट म्हणजे ह्या दुकानांना लागूनच खूप थ्रिफ्ट स्टोर्स आहेत. आणि ही सगळी मुख्य रस्त्यावर आहेत. थ्रिफ्ट स्टोर्सची घोषणा खास टीसाठी आहे!” ‘टीसाठी’? म्हणजे माझ्यासाठी? गडबडून मी अँड्रूकडे पाहिलं. तो माझ्याकडे पाहून हसत होता. प्रवासावर निघण्याआधी अँड्रू जूनोत काय करायचं हे गूगलवर बघत होता आणि तिथे फक्त दागिन्यांची दुकानं आणि थ्रीफ्ट स्टोर्स म्हणजे ज्याला आपण जुनाबाजार म्हणतो ती दुकाने होती. अँड्रूला माहित आहे की मी कधीच असल्या दुकानात जात नाही आणि म्हणूनच माझी थट्टा करण्यासाठी बसचालिकेला आधीच बक्षिसी देऊन त्याने हे म्हणायला सांगितले होते.
जूनो ही अलास्का ह्या राज्याची राजधानी आहे. रस्त्यात राजधानीची इमारत दाखवत बसचालिका म्हणाली, “अमेरिकेतली सगळ्यात कुरूप राजधानीची इमारत पाहायची असेल तर ही पहा!” आणि खरंच, ती इमारत राजधानी असेल असे वाटले नाही. आणखी गंमत म्हणजे नव्याने शोध लागलेल्या सोन्याच्या खाणीत सोनं मिळवण्यासाठी जेव्हा दोनशे वर्षांपूर्वी झुंबड उडाली आणि दारूची दुकाने जुनोत कुत्र्याच्या छत्र्यांसारखी उगवू लागली तेव्हा एक नवीन कायदा केला गेला - प्रत्येक दारूच्या दुकानाबरोबर एक चर्चही उभे केले पाहिजे. त्यामुळे जूनोसारख्या छोट्या गावात सत्तेचाळीस चर्च आहेत!

एक दिवस आणि एक रात्र प्रवास केल्यानंतर आम्ही स्कॅग्वेला पोचलो. अलास्कातल्या तलावांना आणि नद्यांना एक वेगळाच रंग असतो. हिमालयातल्या नद्यांसारखा! आम्ही डोंगरदऱ्यातून जाणाऱ्या आगगाडीतून फिरून आलो. आमच्या शेजारीच एक गोरे आजीआजोबा आपल्या कोरियन नातवाबरोबर बसले होते. नातू दहा वर्षांचा असेल पण तो सारखे प्रश्न विचारत होता आणि उत्तरं देतादेता बिचाऱ्या आजीआजोबांच्या नाकीनऊ येत होते. मधेच तो मुलगा म्हणाला, “कधीकधी मी विनोद करतो पण मला कळत नाही की मी विनोद केला आहे”. आम्ही सगळे हसलो. अँड्रू म्हणाला, “भारतात कधी सोन्याच्या शोधामागे लोक वेडे झाले होते का?” मी म्हटलं, “भारतात सोन्याची एक प्रसिद्ध खाण आहे कोलार नावाची पण तिथे कधी गोल्ड रश झाल्याचे ऐकिवात नाही”. स्कॅग्वेच्या छोट्या गावात अर्थातच दागिन्यांची दुकाने आणि दारूचे गुत्ते होते. ‘द रेड आनिअन सलून’मधून बियरच्या पेल्यांचा आणि संगीताचा आवाज रस्त्यापर्यंत येत होता. मी अँड्रूला म्हटलं, “पुण्यात ‘सलून’ असं फक्त न्हाव्यांच्या दुकानावर लिहितात”. तो आता कुठे जायचं हे गूगल मॅप्सवर पाहत होता म्हणून उगीच हसल्यासारखं करून म्हणाला, “आपण स्मगलर्स कोव्हला जाऊया”. मी भारतातल्या गमतीजमती अनपेक्षितपणे त्याच्याकडे भिरकावत असते ह्याची त्याला आता सवय झाली आहे.

दिवसभर फिरून थकूनभागून आम्ही जहाजावर जेवायला परतलो पण सुब्रमण्यमसाहेब आज बहुतेक झोपा काढत होते. जेवायला एकही भारतीय पदार्थ नव्हता! माझा पडलेला चेहेरा पाहून एका तरुण चिनी आचाऱ्याला माझी दया आली. म्हणाला, “आय कॅन मेक व्हेजिटेरियन चायनीज फ्राईड राइस फॉर यू; वेट आय विल गेट अ फ्रेश पॅन”.

मी आश्चर्यचकित झाले. ह्याला कसं कळलं की मला मांस शिजवलेल्या भांड्यात केलेला पदार्थ खाता येत नाही? मासाच्या नुसत्या कल्पनेनंच माझी भूक मरते. त्या दिवसापासून तो मला हवा तसा फ्राईड राइस करून देऊ लागला. मी त्यांच्या ऍपवर अर्थातच त्याचं कौतुक केलं आणि आभार मानले. दुसऱ्या दिवशी त्यानं मला सांगितलं की त्यांच्या सकाळच्या स्टॅन्डअप मीटिंगमध्ये त्याचं खूप कौतुक झालं! म्हणजे हे स्टॅन्डअप मीटिंगचं खूळ जहाजावरही पोचलेलं दिसतंय!
त्यानंतरच्या दिवशी ह्या प्रवासाचं लक्ष्य असलेला दिवस उजाडला. आम्ही दोघे भल्या पहाटे उठून निरीक्षण करण्यासाठी खास उघडलेल्या ठिकाणी जमलो. ग्लेशर बे नॅशनल पार्कमधील तीन पार्क रेंजर माहिती देण्यासाठी आले होते. हिमनद्या कशा तयार होतात आणि काव्हिन्ग म्हणजे त्यांना पिल्लं होतात म्हणजे काय ही माहिती त्यांनी दिली. डाव्या बाजूला हिरवी-निळी लहानशी मारजरी आणि समोर भलीमोठी पण माती मिसळल्यामुळे आजूबाजूच्या डोंगरदऱ्यांमध्ये हरवलेली ग्रॅंड पॅसिफिक ह्या हिमनद्या होत्या. वर निळं आकाश, हवेत थोडी हुडहुडी आणि हे सगळं सकाळच्या सूर्यप्रकाशात न्हाऊन निघालेलं! आम्ही दोघं बराच वेळ अनिमिष नेत्रांनी हे पाहात होतो. जहाजाने समुद्राच्या मधेच नांगर टाकला होता.
हळूहळू डेकवरची गर्दी वाढली आणि गजबजाट ही. समोरच्या नयनरम्य दृश्याकडे एखाददुसरा कटाक्ष टाकून लोक बडबड करू लागले. दोन जोडपी आणि त्यांची लहान मुलं माझ्या शेजारी उभी राहून अखंड बडबड करत होते. “मी मूळचा हाँगकाँगचा. आता सॅस्कटूनमध्ये राहतो”, त्यातला एक पुरुष म्हणाला. “हो का? आम्ही फिलिपीन्सहुन कॅनडात आलो. आता कॅलगरीत राहतो. दर वर्षी फिलिपीन्सला एकदा तरी जातो. आमचे बरेच कुटुंबीय तिथे आहेत”, एक बाई म्हणाली. स्थलांतरित लोकांच्या नेहमीच्या गोष्टी! मला त्यांचं बोलणं ऐकायचं नव्हतं; केवळ हिमनद्यांचं सौन्दर्य डोळ्यांत आणि मनात साठवायचं होतं. आणि पुढे कधी तरी ते सौन्दर्य पाहण्यासाठी एक विडिओ काढायचा होता. ह्या क्षुल्लक गप्पा केव्हा बंद करतील ह्याची वाट बघत मी खूप वेळ थांबले. माझी जागा विडीयोसाठी अगदी सोयीची होती म्हणून मला दुसरीकडे जायचे नव्हते. शेवटी वैतागून मी त्यांना म्हणाले, “जरा शांत राहता का? मला विडिओ काढायचा आहे.” माझ्याकडे रागीट कटाक्ष टाकत ती मंडळी दुसरीकडे गेली. बरं झालं, कटकट गेली असा विचार करत मी विडिओ काढला.
दुपारी आमचे जहाज परत निघाले. पुढच्या वेळेला छोट्या बोटीतून हिमनद्यांच्या अगदी जवळ जायचं असं ठरवून आम्ही जेवायला गेलो. जहाजाचा कप्तान प्रवाश्यांना भेटत इकडे तिकडे फिरत होता. एका जोडप्याशी गप्पा मारून झाल्यावर त्या जोडप्यातील पुरुषाने त्याला विचारले, “अँड वॉट इज युअर रोल?” कप्तान म्हणाला, “आय अँम द कॅप्टन” आणि सगळीकडे खसखस पिकली. मी कप्तानाला आमची ओळख करून देत म्हणाले, “गेले दोन महिने अँड्रू स्मिथसोनियनची एक टीव्ही सीरीज ‘डिसास्टर्स ऍट सी’ पाहतोय आणि मलाही पाहायला लावतोय!

समुद्रप्रवासात बोटी कशा बुडतात आणि का बुडतात ह्याची मीमांसा पाहून पाहून मी घाबरून गेले आहे”. कप्तान गडगडाटी हसला. अँड्रूबरोबर फोटो काढण्याची विनंती करत मी म्हणाले, “ह्या फोटोचं नाव मी ‘द पेसिमिस्ट अँड द ऑप्टिमिस्ट’ असं ठेवणार आहे. फोटो काढून झाल्यावर जाताजाता तो हसत म्हणाला, “अँड हू इज द ऑप्टिमिस्ट?”

हा प्रवास जर नऊ दिवसांऐवजी महिन्याभराचा असता तर किती बरं झालं असतं असा विचार करत असतानाच आमचं जहाज व्हॅन्कूव्हरच्या बंदरात पोचलं आणि आम्ही नाईलाजानं जमिनीवर पाऊल टाकलं.



**वासंती मुदकण्णा**



# संध्याकाळ

" सांज ये गोकुळी सावळी सावळी" मधली सुंदर, किणकिणनारी असो अथवा " ये शाम मस्तानी , मदाहोश किये जाय" मधली धुंद प्रेमाने मोहरलेली असो,संध्याकाळ नेहेमीच हुरहूर लावणारी असते. सूर्याला "ज्योती कलशाची" उपमा पंडीत नरेंद्र शर्मांनी" ज्योती कलश छलके" या अप्रतिम गीतामध्ये दिली आहे. हा मंगल ज्योती कलश दिवस भर आपला सोनेरी प्रकाश उधळत दशदिशा
उजळून टाकतो. आणि मग येते केसरी संध्याकाळ. उदय आणि अस्ताच्या मधली. इतकी सुरम्य, तेजाळलेली तरीही हातातून काहीतरी निसटून चालले आहे याची हुरहूर लावणारी.

लहानपणी सांजवात लावली की आई आम्हाला देवापुढे बसून परवचा( शुभंकरोती, भीमरूपी, रामरक्षा) ,
पाढे म्हणायला बसवायची. आज इतकी वर्ष झाली तरी तो संधिप्रकाश, त्या तेलाच्या ज्योतीचा आणि उदाबत्तीचा मिसळलेला गंध, त्या स्तोत्रांच्या उच्चारणाचा नाद यांचे गारुड मनावर अलगद तरंग धरून आहे.

उन्हे उतरायला लागली की संध्याकाळची चाहूल लागायला सुरुवात होते. दाट पिवळा प्रकाश हळूहळू सोनेरी व्हायला लागतो. तो ज्योतीकलश आपला सांडलेला किरणांचा पसारा आवरता घ्यायला लागतो. असंख्य मावळतीचे रंग आकाशात गर्दी करायला लागतात. चित्रकाराच्या कुंचल्यातून आकाशाच्या पडद्यावर भव्यदिव्य चित्र चितारले जाते, डोळ्यांचे अक्षरशः
पारणे फिटते आणि मग सारे समेवर येऊन तो केसरी गोल आपल्यात सारे रंग सामावून घेऊन घेतो. आणि मग सावकाश कधी घरांच्या रांगांमागे तर कधी नारळाच्या झावळ्यामागे , कधी उंच डोंगरामध्ये तर कधी फेसाळणाऱ्या समुद्रात , कधी ढगांच्या आड तर कधी न दिसणाऱ्या पल्याड दूर क्षितिजावर अलगद उतरत उतरत नाहीसा होतो. ती वेळ केवळ निःशब्द करणारी असते. असे कितीतरी सुंदर सूर्यास्त कधी अनपेक्षीत पणे वाटेत भेटतात, हल्ली बऱ्याचदा आमच्या घराच्या डेक वरुनही भेटतात. प्रवासाला गेलो की आम्ही या सूर्यास्ताचा मागोवा घेत अक्षरशः मैलोनमैल फिरतो. कधी नाशिकच्या आसापासच्या टेकड्यांवर, कधी कोकणांतल्या, केरळच्या एकांत समुद्र किनाऱ्यांवर, कधी हवाई बेटांच्या टेकड्यांवर तर कधी पैसिफिक महासागराच्या अथांग निळाईवर. तो सुंदर कनकगोल अलगद ओंजळीत येतो आणि मग हलकेचं अदुष्य होतो. मागे राहाते काही भव्यदिव्य अनुभूतीने डोळ्यांच्या कडेवर
जमा झालेले पाणी. आम्ही तो शांत क्षण मनात साठवून घेत काही काळ स्तब्ध बसून रहातो .... निःशब्द.. निर्विचार

**शिल्पा साठे**







# अप्रकाशित कविता




यावेळच्या हितगुजमध्ये लेख लिहिण्याची मुदत टळून गेली तरी कल्पनेच्या पागोळ्या टपकेनात. त्यावेळी कधीही प्रसिद्ध न झालले ही एका सुप्रसिद्ध कवीची कविता सापडली आणि तीच आपल्या वाचकांच्या समोर ठेवत आहे.

कवी यशवंत कदाचित नव्या पिढीला आठवत नसतील, परंतु माझे वडील विद्याकुमार शेरे यांचे ते मित्र होते .आम्ही चिपळूणला असताना ते आमच्या घरी आले होते व त्यांनी 'एक चिमुकली बालिका ऋजुता'कविता लिहिली. ती आमच्या घरात माझ्या त्या वेळच्या माझ्या फोटोसहित विराजमान होती. अनेक वर्षांनंतर मी ती इथे घेऊन आले. इतक्या वर्षांचं हे एक कुणाला न दिसलेलं गुपित मी आज आपल्या पुढे सादर करत आहे

मी न लिहिलेली पण माझ्यावर एका प्रसिद्ध कवीने लिहिलेली १९५० सालातली ही कविता !

ही असे सुकोमल कळी
बालिते मानसा भुली
कीं कांचनमृगशावकासारखी
दावितसे किति हुली

सुळसुळ जेविं मासळी
थबकुनी धावते जळीं
ओघांत नदीच्या दीपकळी कीं
वाहत ही चालली

ही अनेकांचिया कटीं
अवलोकुनि. गमतें पटीं
ही काय चिमुकली हस्तीदंती
चालविती सोंगटी

मृदु मंजुल किति बोलते
साखरी काय गोल ते
हलुवार रेशमी तान गायिका
गळयानेंच सोलते

अत्तरी कुपी खोलली
तीमधलि सुगंधावलि
घरकुलीं काय चालती–बोलती
जाहलीच बाहुली

जरि फिरे उघडि-वाघडी
तरि गमते गोरस-वडी
ही मोत्यांची कीं लडी, घातली
कीं जोत्स्नेची घडी

कटि कुंभ सुधेचा कुणी
अप्सरा जाइ घेउनी
हा एक थेंब–जे तयांतुनी
सांडले हेंदकाळुनी

* * *

लाविली कुणासहि ळळा
परि तोच मला आगळा
मम काव्यलतेला त्यांत लाभल्या
संजीवनिच्या चुळा

—यशवन्त

**ऋजुता पाथरे**



# पाऊस

काल आकाश अगदी भरून आलं होतं,काळ्या रंगाने ओथंबल होतं,वारा ही कावरा बावरा झाला होता.एखाद्या काळ्या लोकरीचा गुंता व्हावा,आणि तो गुंता हळुवार एकेक धागा सोडवत जवा,तसे आकाशातील काळ्या ढगांचे एकमेकात गुंतलेले धागे हळुहळु सुटत होते,आणि त्यामुळे मधूनच  पांढुरक्या पडलेल्या आकाशाच्या झिरमिळ्या दिसत होत्या.डेकवर चहा प्यायला बसले होते पण पाऊस कुठल्याही क्षणी पडेल असे दिसत होते,तेव्हढ्यात पाण्याचा थेंब डेकच्या लाकडी पट्टीवर पडला. टप असा आवाज आला,पाऊस स्वतःची लय शोधत होता,पुन्हा एक मोठा थेंब,पुन्हा टप असा मोठा आवाज,एकेक थेंब मोजून घ्यावा तसे शिस्तीने त्यांचे पडणे चालू झाले,आता पावले तालात पडायला लागली,नर्तकी सारखी डौलदार... डेक डोअर बंद करून आत आले,पण पावसाला ते आवडले नसावे,डेकच्या काचेवर त्याची टकटक चालू झाली,धारा तिरक्या झाल्या," तुला घरात नाही हं घेणार असं त्याला प्रेमळ बजावल्यावर त्याने आपला मोहरा बदलला,आणि मनसोक्त आवाज करत पडायला लागला.कुंडीतली चिमुकली पिवळी फुलं बावरली,पण एकदा भिजल्यावर लहान मुलासारखी आनंदित ही झाली.पावसाचा थेंब थेंब आपल्या चिमुकल्या तळहातावर झेलू लागली. जांभळ्या फुलांनी वाऱ्याच्या साथीने जल्लोष केला,फुलांचे देठ थरथरले.त्यांच्या पाकळ्या अगदी स्वच्छ झाल्या,पावसाच्या धारेबरोबर त्यांचे अनोखे नृत्य चालू झाले.आता पावसाचा जोर वाढलाच,तो जोर फुलांना सहन होईना,पाकळ्यांनी देठाला घट्ट धरले होते,पण त्यातली एक पाकळी निसटलीच.जमिनीवर पडायच्या आत वाऱ्याने तिला तळहातावर झेलली,आणि भिर भिरत तिचा अंतिम प्रवास सुरू झाला,किती तरी वेळ ती मला दिसली,पण मग दिसेनाशी झाली
झेंडूच्या पाकळ्यांच्या सुरनळीत मधल्या पोकळीत थेंब हळूवार येऊन बसले,पाकळीला गुदगुल्या झाल्या,आता ती सुरनळी उघडणं भागच होतं.पाकळीच्या टोकावर एक तपकिरी बिंदू
आणि बाकीची पाकळी नारिंगी उमलण इतकं सुंदर असतं तर....
हळूहळू पाऊस हुंदके देत थांबला,आणि झेंडूचं फूल मजेत हसलं..जगातली सगळी दु:ख संपल्यासारखं निर्मळ निरागस.. माझ्याही चेहेऱ्यावर एक हास्य रेषा उमटली,आजचा दिवस सार्थकी लागला होता....

आईने जाऊ नकोस असं बजावूनही उनाडक्या करून
दमून घरी आलेल्या,आणि नंतर हातपाय धुवून आईकडे एक तिरकी नजर टाक,तिच्या रागाचा अंदाज घेत पर्वचा म्हणणाऱ्या नटखट लहान मुलासारखे निळे आकाश दिसत होते...स्वच्छ लाडिक,लाडीगोडी लावणारे..
बारीक ऊन पडले.थोड्या वेळाने
उन्हं संध्याकाळच्या पोटात दिसेनाशी झाली,तिन्हीसांजेकडे झुकलेली संध्याकाळ मंद पावले टाकू लागली.आकाशातून उजेडाचे बारीक झरोके दिसायला लागलेत,आकाशही जरासं काळवंडलय,बकुळीच्या फुलासारखा सावळा प्रकाश शेवटी रेंगाळतोय,त्या सावळकांति प्रकाशाची खूप असोशी निर्माण झालीय.झाडाला मिठी मारलेले सौरदिवे डोळे मिचकवायला लागलेत.त्याचा निळसर उजेड फार मनोरम दिसतोय.मध्येच घरापुढच्या फरशीवर पावसाचे मोठे थेंब पडतायत, वातावरणातील आर्द्रता आणि आर्तता चांगलीच जाणवत्ये त्या आरस्पानी उजेडात बुडून जावं असं वाटतंय,अशीच निर्वाणाची अवस्था असावी का?...
मी आता पायरीवर बसल्ये,पण तिथून उठावेसे वाटत नाहीये, काळसर आकाशाला छेद देणारा एखादा लांब मानेचा बगळा उडताना दिसतोय.विमानाचे उघडमीट करणारे दिवे
दिसतायत,संध्याकाळच्या लांब लांब सावल्या पडायला लागल्यात,अंधाराची पोरं पटापटा बाहेर पडलीयत आणि झाडांच्या फांद्यांवर लोंबकळू लागली,त्यांचा काळाकुट्ट रंग त्यांनी सगळ्या झाडांवर पसरून दिला,आणि अंधार आणिकच निबीड झाला....

असं वाटतंय की आपलं आयुष्य एखाद्या होडीसारखं दोन किनाऱ्या मध्ये हेलकावतय,खूप आत,खोल खोल काहीतरी खुपतय,न सांगता येण्याजोगं, हुरहुर दाटून आलीय,डोळे मिटून कुण्या काळच्या विचारांच्या आवर्तात मी सापडलेय.
गरगरणाऱ्या भोवऱ्यासारखी अवस्था झालीय.एक दीर्घ सुस्कारा टाकून मी तिथून उठले,
पुन्हा उद्या नाव दिवस उजाडेल अशी आशा बाळगून....

**ऋचा सावरकर**



# आठवणींचा पाऊस

आठवणीं चा पाऊस बरसू लागतो
क्षण आणि क्षण ओलाचिंब होऊन नाहून निघतात
मन कागदाची नाव होऊन साचलेल्या पाण्यात हेलकावे घेऊ लागते
आठवणी च्या पावसाची हि रिमझिम सतत चालू राहते
सोसाट्याच्या वादळ येऊन जाते
कधी त्या पावसात बेधुंद नाचावेसे वाटते
कधी तिथेच जरा स्थिरावेसे वाटते
पण पाऊस असाच चालू राहतो मातीला भिजवत अश्रुना विरघळवत
आणि मग काही वेळाने ती रिमझिम थांबते
सगळे शांत होते
आठवणींची पाऊलवाट पुन्हा हिरवळून निघते
आणि ...
उरते फक्त मनाला सुखावणारी वाऱ्याची एक हलकीशी झुळूक

**रसिका राऊत**




**रिया कुलकर्णी**
**कराटे स्पर्धा 2nd place**

# एक अविस्मरणीय सहल

## हर्णे , कोकण

झुक झुक झुक झुक अगीनगाडी
धुरांच्या रेषा  हवेत काढी
पळती झाडे पाहूया
मामाच्या गावाला जाऊया...



हे गाणं आम्ही आधी ऐकलं होतं पण ह्या वर्षी उन्हाळ्यामध्ये आम्ही खरंच मामाच्या गावाला, कोकणात जाऊन आलो, तेही कोकण रेल्वे मध्ये बसून! आमची कोकणातली ही पहिलीच ट्रिप खरच आमच्यासाठी एक memorable experience होता.










मामाच्या म्हणजेच आईच्या आजोबांचे गाव हर्णे, तिथे आमचे खूप जुने घर आहे. ते घर इकडच्या घरांसारखेच दोन मजली पण खूप वेगळे, घरातला मोठा झोपाळा आणि वरची माडी, ज्याला आपण बाल्कनी म्हणतो, ती आम्हाला विशेष आवडली. घराजवळच एक मोठ्ठ तळं आहे, ज्यात आम्ही पोहायला गेलो. पहिल्यांदाच स्विमिंग पूल सोडून आम्ही असे निळ्या आकाशाखाली तळ्यात वाहत्या पाण्यात पोहत होतो. तळ्याच्या बाजूलाच एक विहीर होती, ३६फूट खोल! गावातल्या सगळ्यांनी आम्हाला विहिरीत उडी मारायच challenge दिलं, आधी थोडी भीती वाटत होती पण मग मामा बरोबर आम्ही त्या विहिरीत उड्या मारल्या, It was a great feeling of achievement!







Minnesota - Land of 10,000 lakes! इकडे आपल्याला समुद्र दिसतच नाही. पण गावाला मात्र अरबी समुद्र हाकेच्या अंतरावरच आहे आणि समुद्राच्या लाटांचा आवाज आम्ही घरातूनच ऐकत होतो. एकीकडे हिरवे हिरवे डोंगर आणि डोंगराच्या पायथ्यापासून लगेचच सुरु होणारा विशाल समुद्र, हर्णे बंदरावरच lighthouse, शिवाजी महाराज प्रत्यक्ष भेट देऊन गेलेला भुईकोट किल्ला - फतेह गड, गोवागड, पाण्यातला सिंधुदुर्ग किल्ला आणि भरपूर मासे.... अमेरिकेपेक्षा कोकण खूप वेगळे आहे आणि तिकडे आमचा एक आठवडा कसा गेला ते आम्हाला कळलंच नाही!

आम्ही मामाबरोबर आजू बाजूची खूप ठिकाणं बघितली. केशवराजला गायीच्या मुखातून येणारं पाणी, पण त्याचा उगम खूप वर डोंगरात जाऊनही आम्हाला सापडला नाही. आंजर्लाचा कड्यावरचा गणपती - १८०० सालचे हे देऊळ आहे. डोंगरावर असलेले गावचे देऊळ - खेम आणि तिकडे बांधलेल मोठ्ठ धरण! आम्ही सगळे धरणाच्या थंड पाण्यात उतरलो आणि मनसोक्त भिजलो.
कोकणातली घर, शाळा, रस्ते सगळंच आपल्यापेक्षा खूप वेगळे आहे. तिकडच्या लोकांचं साधं राहणं आणि प्रेमळ वागणूक - We just got a different but loving perspective of an everyday life!
माझ्या आजोबांना झाडे लावायला खूप आवडायचे . त्यांची आठवण म्हणून आम्ही आमच्या बागेत नारळाचे झाड लावले आहे. पुढच्यावेळेस ते झाड किती वाढलं आहे, हे बघायला आम्ही नक्की परत मामाच्या गावाला जाणार .......



**अन्वयी & मृण्मयी वडके**

## उत्सव माझ्या दारी



**केतकी कुलकर्णी**



**केतकी नाईक चितळे**




# मराठी शाळा






नमस्कार!
आपल्या मराठी शाळेकडून तुम्हाला सर्वांना दिवाळीच्या खूप खूप शुभेच्छा!

आपल्या मराठी शाळेचं यंदाचं २०२३-२०२४ हे तिसर वर्ष आहे आणि ह्या वर्षी ६२ मुलांनी शाळेत ऍडमिशन घेतले आहे. आणि विशेष म्हणजे ह्या वर्षी २ adult विद्यार्थ्यांचेही आपल्या शाळेत आगमन झालेले आहे.
एप्रिल २०२३ मध्ये प्रथमच मराठी शाळेने in-person लेखी आणि तोंडी परिक्षा घेतली. मुलांना प्रत्यक्ष परीक्षेचा अनुभव आला आणि अर्थातच कोविड नंतर पहिल्यांदाच सगळ्या विद्यार्थ्यांना आणि शिक्षकांना भेटण्याचा योग्य आला.
जून २०२३ मध्ये शाळेची उन्हाळ्याची सहल Weaver lake पार्क मध्ये झाली आणि सर्वांनी एकत्र येऊन २०२२-२०२३ चा शाळेचा शेवटचा दिवस साजरा केला.

ह्या वर्षाच्या टीचर्सची नवे:
प्रविणा पाठक, अमरजा बाबतीवाले, अवनी सावरकर, राहुल कोष्टी माधुरी गोसावी,प्राजक्ता हेबळे ,रोहिणी माळगी ,अदिती बिस्वास, आणि राजश्री पाटील



**मृदुला वडके**

# मागील शब्दकोडे उत्तर

असा शब्द शोधा ज्यात शेवटचे अक्षर ट्ट ची बाराखडी असेल
उदा.
कलंक—बट्टा १)ह्यावर बसून गप्पा मारतात—कट्टा
२)जुगार—सट्टा ३)पूर्ण संपवणे—चट्टामट्टा
४)मस्करी—थट्टा ५)साडीवर शोभून दिसतो—बुट्टा
६)पाठीवर दिलेला धपाटा—रट्टा ७)कष्ट केल्यावर हातावर पडतो—घट्टा
८)धड धाकट—हट्टा कट्टा ९)कुत्र्याच्या गळ्यातील साखळी—पट्टा
१०)लहान मूल काय किंवा बायको काय हे पुरवावेच लागते—हट्ट
११)नगद—वट्ट १२)फुटल्याचा आवाज—फट्ट
१३)तंग—घट्ट १४)मक्याचे कणीस—भुट्टा
१५)आंबट ला हिंदी शब्द—खट्टा १६)मोहित होणे—लट्टू
१७)खूप गोड—मिट्ट १८)हे वशिल्याचे असते—तट्टू
१९)लग्नाच्या जेवणानंतर पोटाची अवस्था अशी होते—तट्ट
२०)एखादी गोष्ट मट कावणे—गट्टम २१)बिहारी लोकांचा आवडता पदार्थ—लीट्टी चोखा २२)गब्दूल व्यक्ती—गट्टू
२३)समुद्रात गलबते इथे थांबतात—जेट्टी
२४)पूर्वी शाळेत उशीरा गेल्यावर ही हमखास हातावर मिळायची—पट्टी
२५)एकमेकांशी न बोलणे—कट्टी २६)मैत्री—गट्टी
२७)भांडल्यावर पुन्हा एकमेकांशी बोलणे—बट्टी
२८)दिवाळी आणि मे महिना ही असतेच—सुट्टी
२९)कल्हई वाल्याने पेटवलेला जाळ—भट्टी
३०)गवंडी काम करणाऱ्याला ही लागतेच—पुट्टी
३१)भाजल्यावर हातावर पडतो तो—चट्टा
३२)रिक्षात बसले की हे पैसे हवेतच—सुट्टे
३३)नक्षी—बुट्टी
३४)ह्या झाडाची फुले पिवळी असतात—बिट्टी
३५)मातीला हिंदी शब्द—मिट्टी
३६)लहानपणीचा खेळ दांडू बरोबर ही हवीच—विट्टी
३७)ही मारली की सगळे चटकन गोळा होतात—शिट्टी



असा तीन अक्षरी शब्द शोधायचा आहे की ज्याचे मधले अक्षर 'प' आहे. उदा—वस्त्र —कापड
१)कारस्थानी—कपटी २)हाताचा एक भाग—कोपर
३)जखम वाळल्यावर येते—खपली ४)हे माथ्यावर फोडतात—खापर
५)गरीबाचे घर—झोपड ६)घोटाळा—घपला
७)वीज—चपला ८)तरतरीत—चपळ
९)वही—चोपडी १०)चारपट—चौपट
११)डोळ्यावर येणारी गुंगी—झापड १२)पानाची/चहाची असते—टपरी
१३)बिंदु—ठिपका १४)साधक—तपस्वी
१५)अशी पोळी नको रे बाबा—चापट,पापड १६)कंजुष—कृपण
१७)पांडवांची पत्नी—द्रौपदी १८)पार्वतीचे एक नाव—अपर्णा
१९)रांगोळीतील एक सुचिन्ह—गोपद्म २०)राजा—नृपती
२१)एक फळ- पपई २२)मोजण्याचे जुने परिमाण—मापटे
२३)एक पक्षी—पोपट २४)असा पसारा नको बाबा—फापट
२५)शंभर पैसे—रुपया २६)बाईलवेडा—लंपट
२७)केस कापणे—वपन २८)आण/भाक—शपथ
२९)अळणी—सपक ३०)रागीट—तापट
३१)तुपात ओथंबलेले—तुपट ३२)मच्छीमाराचे एक जाळे—रापण
३३)बाळाला गुंडाळायचे मऊ वस्त्र—दुपटे ३४)हारा- टोपली
३५)संगीतातील एक प्रवाह—धृपद ३६)असा मार्ग बरेच जण अवलंबतात—धोपट
३७)एक वाद्य—चिपळी ३८)केर भरायचे साधन—सुपलं
३९)आरोप—ठपका ४०) परका—उपरा

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ शि | वा | २ जी | ३ म | हा | ४ रा | ५ ज | की | ६ ज | य |
| र | | ७ व | न | | ८ य | म | | य | |
| ९ सा | व | ध | | १० रा | ग | | ११ ग | ग | न |
| ष्टां | | १२ न | द | | ड | | १३ रे | ड | |
| १४ ग | १५ ज | | | १६ गं | | | | | १७ वा |
| १८ न | र | १९ ना | ळा | | २० अ | २१ जिं | क्य | २२ ता | रा |
| म | | म | | २३ आ | नं | दा | | टी | |
| स्का | | | २४दौ | ल | ता | बा | द | | २५ लिं |
| २६ र | त्न | २७ ग | ड | | | द | | २८ धा | गा |
| | | र्भ | | २९ लो | ह | | ३०तो | र | णा |



नमस्कार मंडळी,

तुम्हा सर्वांना दिवाळीच्या खूप खूप शुभेच्छा!
दिवाळी म्हणजे मरगळलेल्या मनाला उत्साह, आनंद आणि चैतन्य देणारा दिव्यांचा सण. साता समुद्रापलीकडे भारता पासून जरी आपण खूप दूर असलो तरी मराठी माणसाची सण साजरा करायची हौस आपण जपली आहे. आणि या उत्साहाला आपुलकीने मराठी माणसांना जवळ करून प्रेमाच्या धाग्याने बांधणारे आपलं हे मराठी असोसिएशन ऑफ मिनेसोटा!! गेली सतरा वर्ष मी या मंडळाची सभासद आहे आणि माझ्या या मराठी असोसिएशनला मनापासून त्रिवार सलाम.
गेले ३३ वर्ष, मराठी असोसिएशन ऑफ मिनेसोटा कला, सांस्कृतिक आणि पारंपरिक मराठी कार्यक्रम करण्याचे प्रोत्साहन आणि व्यासपीठ देत आहे. अगदी लहान मुलांपासून ते मोठ्यांपर्यंत सर्वजण कार्यक्रमात सहभागी होऊन आपल्यातील सुप्त गुणांना तसेच हौसेला वाव देऊन मराठी मंडळाला सहकार्य करत आहेत. आता पर्यंत आपण मंडळाला जसे सहकार्य करत आहात तसेच या पुढे सुद्धा करत राहा. जास्तीत जास्त मराठी कुटुंबियांना आपण मंडळाचे सभासद होण्यासाठी प्रवृत्त करावे म्हणजे जास्त दर्जेदार आणि नावाजलेले कार्यक्रम आपण रसिकांसमोर सादर करू शकू.
"एकमेका साहाय्य करू, अवघे धरू सुपंथ" या संत तुकाराम महाराजांच्या सुंदर वचनाप्रमाणे आपणाकडून जे जे शक्य होईल ती ती मदत तुम्ही मंडळाला करत राहाल अशी आशा करते.



धन्यवाद
अमिता पेणकर
अध्यक्ष

# वार्षिक अहवाल २०२३

| Financial Status as of 2023 | | |
|---|---|---|
| | **Amount** | **Amount** |
| **Opening Cash Balance as of Jan 1, 2023** | | 63778.85 |
| | | |
| **2023 Revenue:** | | |
| 2022-2023 Member fees received | $1,375.00 | |
| 2022-2023 Non-member fees received | $1,981.00 | |
| Dandiya ticket sales - member/non-member | $3,777.50 | |
| Ganapati donations | $3,498.00 | |
| Sponsorship | $350.00 | |
| Stall fees | $785.00 | |
| Other | $132.32 | |
| 2023-2024 Shala Fees | $6,260.00 | |
| 2023-2024 Member/Non-member fees received | $20,939.27 | |
| **Total Revenue** | $39,098.09 | |
| | | |
| **2023 Expenses:** | | |
| Sankrant | $5,203.33 | |
| Holi | $1,512.27 | |
| Vasant Bahar | $1,149.39 | |
| Picnic & camping | $3,154.30 | |
| Ganapati | $3,652.26 | |
| Dandiya/Bhondla | $2,625.38 | |
| Charitable donations | $201.00 | |
| 2023-2024 Shala | $1,780.50 | |
| Operating & administrative | $1,480.75 | |
| **Actual Expenses** | $20,759.18 | |
| **Projected** Diwali expenses | | $16,500.00 |
| **Total Projected Expenses** | | $37,259.18 |
| | | |
| **Projected Balance After Diwali 2023** | | **$65,617.76** |

# MAM कमिटी आणि हितगुज संपादकांकडून तुम्हा सर्वांना दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा!



प्रमिला, योगेश आणि चि. प्रत्युष



अवनी, अतुल आणि चि. अर्णव



MAM कमिटी -केतन,विशाखा,अमिता,अश्विनी,मिथुन,मृदुला,नैना,प्रविणा,महेश

# मराठी असोसिएशन ऑफ मिनेसोटा सांस्कृतिक कार्यक्रम




इंडियन फेस्टिवल २०२३





पिकनिक २०२३





गणेश उत्सव २०२३

भोंडला दांडिया २०२३